**पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर**
फोन नं. ०७१७२– २५५१००
E-mail : sp.chandrapur.@mahapolice.gov.in

जा.क्र. पोअचं/एसबी-१/आंजि - स्विकृती/पोअं/२०२३,/२०० | चंद्रपूर, दिनांक : ३१/१२/२०२३

प्रति,

पोलीस अधीक्षक,
गडचिरोली

संदर्भ :- आपले पत्र क्र: पोअग/आस्था/सआलि-१/आंजिब प्रस्ताव/पो.अंमलदार/२३-१०६९३,
दि. ०३-११-२०२३ तसेच सम क्रमांक १२७५६, दिनांक ०४-११२-२०२३.
विषय :- पोलीस अंमलदार यांना आंतर जिल्हा बदलीने स्विकृती प्रदान करणेबाबत.

०००

उपरोक्त संदर्भीय पत्राचे अनुषंगाने अग्रेषीत करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहा. पोलीस उप निरीक्षक (राखीव पोलीस बल गटातील पोलीस अंमलदार वगळता) दर्जा पर्यंतच्या पोलीस अंमलदारांच्या घटक आस्थापना बदली नियमावली तसेच महाराष्ट्र शासन गृह विभाग शा.नि.क्र. संकीर्ण-१०१७/३८४३/प्रक्र-४६९/पोल-५-ब, दिनांक २६-१०-२०१७ अन्वये शासनाच्या गृह विभागाने मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्हा पोलीस दल आस्थापना मंडळाने आपले आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार यांना त्यांचे भरती प्रवर्गात आंतर जिल्हा बदलीबाबत मान्यता (स्विकृती) देण्यात आलेली आहे. तरी नमुद पोलीस अंमलदार यांना नमुद अटी व शर्तीच्या आधीन राहुन त्यांना ०७ दिवसाचे आंत चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर हजर होणे करीता कार्यमुक्त करण्यात यावे.

| अ.क्र. | नांव व पदनाम | मुळ घटक | स्विकृतीचे पद | भरती प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/८३८, पुजा भिमराव चुनारकर | गडचिरोली | पोलीस शिपाई | अजा/SC |
| २ | नापोशि/३१५६, नरेश जकलु येलपुलवार | गडचिरोली | पोलीस शिपाई | विमाप्र/SBC |

**अटी व शर्ती :-**

१. वर नमुद पोलीस अंमलदार आंतर जिल्हा बदलीवर या घटकात हजर झाल्यावर त्यांची सेवाजेष्ठता ही पोलीस महासंचालक, म.रा.,मुंबई यांचे परिपत्रक क्र. ६/२३६/१९८७, दिनांक १६-०२-१९८७ तसेच शा.नि.क्र.:संकीर्ण-१०१७/३८४३/प्रक्र-४६९/पोल-५-ब, दिनांक २६-१०-२०१७ मधील सेवाजेष्ठतेच्या तरतुदी नुसार निश्चीत करण्यात येईल. तसेच त्यांना या घटकाकडून हजर झाल्यानंतर पोलीस मुख्यालय येथे नेमणुक देण्यात येईल. याबाबत सबंधीत पोलीस अंमलदार यांचे कडून बंधपत्र / संमतीपत्र भरुन घ्यावे व ते त्यांचे सेवापटात चिटकविण्यात यावे.
२. वर नमुद पोलीस अंमलदार हे सध्यास्थितीत कोणत्याही प्रकारची मोठी शिक्षा भोगत नसावे. तसेच त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारचे न्यायालयीन प्रकरण अथवा प्राथमिक /विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावीत नसावी.
३. आंतर जिल्हा बदलीने हजर होणारे पोलीस अंमलदार मागासप्रवर्गाचे असल्यास त्यांच्या जातीचे जात वैधता प्रमाणपत्र असणे बंधनकारक असल्याने त्यांचे कार्यमुक्त आदेशासोबत जात वैधता प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
४. बिंदुनामावली करीता नियुक्ती आदेशाची प्रत/रोस्टरची प्रत, स्थायीत्व प्रमाणपत्र त्यांचे कार्यमुक्त आदेशासोबत पाठविण्यात यावे. सदरची प्रत सोबत नसल्यास त्यांना हजर करण्यात येणार नाही.
५. उपरोक्त पोलीस अंमलदार हयांना आंतर जिल्हा बदलीवर हजर होणेकरीता ०७ दिवसाचे आंत कार्यमुक्त करण्यात यावे. अन्यथा सदर पोलीस अंमलदार यांची स्विकृती रद्य समजण्यात येऊन त्यांचे जागी प्रतिक्षा यादीतील इतर पोलीस अंमलदार यांना स्विकृती देण्यात येईल. तसेच नमुद पोलीस अंमलदार हे वरील अटी व शर्तीची पुर्तता करीत असतील तरच त्यांना आंतर जिल्हा बदली करीता कार्यमुक्त करण्यात यावे.

**(पोलीस अधीक्षक चंद्रपूर जिल्हा आस्थापना मंडळ यांचे मान्यतेने)**

**(रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी)**
पोलीस अधीक्षक चंद्रपूर